# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०२/२०२५ (शनिवार) सकाळ**

---

**रामटेक परीसरात सुरू असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकुन देहव्यापार करणाऱ्या पिडीत महिलेची सुटका करून ३ आरोपीतांना केली अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई**

**पोलीस स्टेशन रामटेक :—** दिनांक १५/०२/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, आरोपी क्रं. १) क्रिष्णा घनश्याम वरठी, रा. चारगाव ,ता.रामटेक (हॉटेल चालक) आणि  राकेश केशव साखरे, रा चारगाव, ता. रामटेक (हॉटेल मालक) हे स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी महीलांना पैश्याचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून आर.एस.लॉज ,मौदा टी पॉईन्ट, नगरधन रोड, रामटेक येथे रूम उपलब्ध करून देवून देहव्यापार करवुन घेत आहे. अशी गुप्त माहीती मिळाल्याने  आर.एस.लॉज ,मौदा टी पॉईन्ट, नगरधन रोड,रामटेक येथे रामटेक पोलीसांनी धाड टाकली असता आरोपी क्र. १) **क्रिष्णा घनश्याम वरठी, रा. चारगाव ,ता.रामटेक (हॉटेल चालक) , २) राकेश केशव साखरे रा चारगाव ता रामटेक (हॉटेल मालक) आणि ३) स्वप्नील राजकुमार इंगोले, रा आझाद वार्ड,झेंडा चौक, रामटेक (हॉटेल मधील मदतनीस)**  हे अनैतिक देहव्यापार चालवत असल्याचे खात्री झाल्याने आरोपीतांविरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ३,४,५,७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ अन्वये गुन्हा नोंद करून एका पिडीत महिलेची सुटका करण्यात आली आहे. तसेच घटनास्थळावरून  ४४,९०० /— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूद्ध गुन्हा नोंद नागपूर ग्रामीण ,कुही पोलसांची कारवाई

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक १४/०२/२०२५ रोजी कुही पोलीस पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, अशोक लेलॅड ट्रक ने कबाडी मध्ये लपवुन सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. अशा माहिती वरून पोलीसांनी मौजा कुही ते वडोदा रोड येथे नाकाबंदी केली असता एक कथ्थ्या रंगाचा **ट्रक एम.एच.४० सी.टी. ०९५९ हा** येतांना दिसला . सदर वाहनाला थांबविले असता आरोपी क्र १) राहुल घनश्याम रहांगडाले वय ३३ वर्ष,रा.मोतीनगर वार्ड नं.३२ बालाघाट ,जिल्हा—बालाघाट, राज्य मध्य प्रदेश ,आरोपी क्र.२) धनराज राजाराम रहांगडाले, वय ३९ वर्ष,रा. किन्ही वार्ड क्र.१७ ता. खैरलांजी जिल्हा—बालाघाट,राज्य मध्य प्रदेश याची विचारपुस केली असता त्यांनी याने उडवा उडवी चे उत्तर दिले त्यामुळे पंचासमक्ष **वाहनाची तपासणी केली असता कबाडी च्या खाली सुगंधीत तंबाखू १० होला, हुक्का शिशा तंबाखू असे ६ बो—या मध्ये १२०० पाकिटे किंमती रुपये १,९६,८००/— रूपये चा मुददेमाल व वाहतुकीस वापरलेला ट्रक एम.एच ४० सी.टी. ०९५९ किमंती १३,००,०००/— रूपय असा एकुण १४,९६,८०० रु चा मुदेदमाल जप्त** करण्यात आला आहे. आरोपी विरूद्ध कलम १२३,२२३,२७४,२७५,३(५) भा.न्या.संहीता—२०२३ सह कलम ५९ अन्न व सुरक्षा आणि मानक अधि अन्वये गुन्हा नोंद केला आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर